महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
सहसंचालक, लेखा व कोषागारे, नाशिक विभाग, नाशिक
दुसरा मजला, लेखा कोष भवन, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, नाशिक-४२२००१

दुरध्वनी क्रमांक - (०२५३) २९७१५७४;  E-Mail ID :- jd-nashik@mah.gov.in

क्रमांक आस्था-२०२५/प्र.८(२)/क.ले./भरती प्रक्रीया /२०२५/0396/1077  दिनांक:- 06 MAY 2025

**विषय** :- कनिष्ठ लेखापाल भरतीप्रक्रियेच्या अनुषंगाने उमेदवारांना प्रश्नपत्रिकेचे स्वरुप, कालावधी व परीक्षेचा दिनांक मा.संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेबाबत....

**संदर्भ** :- या कार्यालयाची जाहिरात क्रमांक सहसंलेवको/सरळसेवा भरती/क.ले./जा.क्र.१/२०२४, दि.२३.०१.२०२५

## सूचनापत्रक

सहसंचालक, लेखा व कोषागारे, नाशिक विभागाची कनिष्ठ लेखापाल रिक्त पदाची जाहिरात संदर्भिय जाहिरात दिनांक २३.०१.२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. सदरील परीक्षेच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

- प्रश्नपत्रिकेतील १०० प्रश्नाचे विभाजन चार ( A, B, C, आणि D ) कालबद्ध विभागात खालीलप्रमाणे येईल.
- प्रत्येक विभागात २५ प्रश्न असतील आणि ३० मिनीटे वेळ दिला जाईल.

| अ.क्र. | विषयाचे नाव | कालबद्ध विभाग | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | Group A | Group B | Group C | Group D |
| १ | Marathi / मराठी | ७ | ६ | ६ | ६ |
| २ | English / इंग्रजी | ६ | ७ | ६ | ६ |
| ३ | General knowledge / सामान्य ज्ञान | ६ | ६ | ७ | ६ |
| ४ | Intellectual Test /बौद्धिक चाचणी | ६ | ६ | ६ | ७ |
| **प्रश्नांची एकुण संख्या - १००** | | **२५** | **२५** | **२५** | **२५** |
| **विभागानूसार वेळ एकुण - १२० मिनीटे** | | ३० मिनीटे | ३० मिनीटे | ३० मिनीटे | ३० मिनीटे |

- मागील विभागासाठी दिलेला वेळ पूर्ण करेपर्यंत उमेदवारांना पुढील विभागात जाण्यास प्रतिबंध केला जाईल. या व्यतिरिक्त, उमेदवारांना विभागानिहाय दिलेला वेळ पूर्ण झाल्यानंतर प्रश्नांचे पुनरावलोकन करण्याची किंवा त्यांच्या प्रतिसादात बदल करण्याची परवानगी दिली जाणार नाही. मागील विभागासाठी दिलेला वेळ पूर्ण झाल्यानंतर पुढील विभागाचे प्रश्न आपोआप सुरु होतील.
- **सहसंचालक, लेखा व कोषागारे, नाशिक विभाग, नाशिक या विभागाची कनिष्ठ लेखापाल पदाची ऑनलाईन परीक्षा दिनांक २३ मे २०२५ रोजी ३ शिफ्ट मध्ये सकाळी ०९ ते ११, दुपारी ०१ ते ०३ आणि संध्याकाळी ०५ ते ०७ या वेळेनुसार घेण्यात येईल.**
- उमेदवारांनी प्रवेशपत्रावर ( Admit Card ) नमुद केलेल्या वेळेनुसार परीक्षा केंद्रावर उपस्थित रहावे.

**( माधव धों.थैल )**
सहसंचालक (प्र.) ,
लेखा व कोषागारे, नाशिक विभाग, नाशिक